स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥ अंतर्गत, वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत गाव निवडीचे निकष व सर्वसाधारण कार्यालयीन पध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना...

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः स्वभामि-२०२१/प्र.क्र.२७२(१)/पापु-१६**

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: १० जानेवारी, २०२२

**वाचा**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांक: स्वभामि-२०२१/प्र.क्र.२७२(१)/पापु-१६, दिनांक २६ नोव्हेंबर,२०२१.

२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक:-S-११०११/२/२०२०-SBM-DDWS (Part-१), दिनांक १४ डिसेंबर, २०२१.

**शासन शुद्धीपत्रक**

उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद ३- उपरोक्त उपांगाकरिता निधी अनुज्ञेयता या शिर्षाखाली १) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये शेवटी पुढीलप्रमाणे अंतभूर्त करण्यात यावे:-

"गावातील घनकचरा व्यवस्थापन या उपांगासाठी अनुज्ञेय निधीमधून होणारी बचत त्याच गावातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी तसेच, गावातील सांडपाणी व्यवस्थापन या उपांगासाठी अनुज्ञेय निधीमधून होणारी बचत त्याच गावातील घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरता येईल."

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०११०१४५२३२८५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea427109026722812 2b638d6f2cdedad62, pseudonym=268C7E15F998F8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2022.01.11 18:28:41 +05'30'

(चं. कृ. मोरे)
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८) जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.
९) सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी.
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११) सहसचिव (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३) प्रकल्प संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१४) उपायुक्त (विकास), सर्व.
१५) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत) , जिल्हा परिषद (सर्व) यांनी या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/ उपसभापती व गट विकास अधिकारी, पंचायत समिती या द्याव्यात व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच यांना द्याव्यात.
१६) कार्यकारी अभियंता/ उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभाग सर्व.
१७) संचालक, मित्रा-नाशिक/नीरी-नागपूर/उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था.
१८) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य/ विश्वेष्वरैय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर (VRCE)/कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे (COEP).
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
२०) संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता अभियान, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल व्दारेही पाठवावा.
२१) कार्यासन (पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती).

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ सार्वजनिक/सामुदायिक शौचालय (CSC) बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०२१/प्र.क्र.३०७/पापु १६

मंत्रालय, ७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.

दिनांक: १२ एप्रिल , २०२२.

वाचा-

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२, अनुषंगाने केंद्र शासनाच्या माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचना व त्यासोबतच्या परिशिष्ठ १ चा भाग-२.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्रमांक: स्वभामि २०२०/प्र.क्र.१९०/पापु-१६,दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२०.

३) केंद्र शासनाचे पत्र क्रमांकः एस ११०११/२/२०२०-SBM-DDWS दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक: स्वभामि २०२१/प्र.क्र. २७२ (भाग-१)/पापु-१६ दिनांक,१८ ऑक्टोबर, २०२१

**प्रस्तावना :-**

राज्याच्या ग्रामीण भागामध्ये शाश्वत स्वच्छता राखण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये स्वच्छ भारत अभियान(ग्रामीण) टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आल्या आहेत. त्यानुषंगाने उपरोक्त वाचा क्रमांक ३ अन्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय (CSC) बांधकामाबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानंतर उपरोक्त वाचा क्र.३ अन्वये केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधकामाबाबत सुचनांमध्ये सुधारणा केली आहे. त्यानुषंगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागामध्ये, सार्वजनिक/सामुदायिक शौचालय (CSC)

बांधकामाबाबत संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रक दिनांक २ नोव्हेंबर, २०२० अन्वये देण्यात आलेल्या सूचना अधिक्रमित करुन नवीन निकष व नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत गावाची हागणदारीमुक्त स्थिती शाश्वत व अबाधित राहण्याच्या दृष्टीने तसेच स्वच्छतेपासून कोणीही वंचित राहणार नाही हे उद्दीष्ट पूर्णपणे साध्य होण्यासाठी ज्या कुटुंबाकडे जागे अभावी वैयक्तिक शौचालय नाही अशा कुटुंबाना तसेच गावामध्ये विविध कारणांमुळे बाहेरुन ये-जा करणाऱ्या/स्थलांतरीत लोकांसाठी, आणि ज्या ठिकाणी लोकांची नेहमी वर्दळ/गर्दी असते (उदा. बाजार) अशा ठिकाणी सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधणे आवश्यक आहे. राज्याच्या ग्रामीण भागातील सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामाबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या घटक व उपांगाचा अर्थ, केंद्र शासनाचे संदर्भाधीन क्रमांक १, व ३ येथील पत्रान्वये तसेच, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे घेण्यात यावा.

**अ) <u>गावाची निवड प्रक्रिया</u> -:**

१) गावामध्ये धार्मिक/नैमित्तिक कामासाठी येणाऱ्या बाहेरगावच्या माणसांचे प्रमाण, गावातील वा जवळची बाजारपेठ, वा, स्थलांतराच्या माध्यमातून आलेल्यांचे प्रमाण लक्षात घेवून गावांचा प्राधान्यक्रम ठरवावा.

२) वीज, पाण्याची उपलब्धता, देखभाल व दुरुस्ती हमी इ. यापुढे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ग्रामपंचायतीने ठराव घेणे आवश्यक आहे.

**ब) <u>शौचालय बांधकाम जागा निवड:-</u>**

१) सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामासाठी निवडलेली जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य असावी. शौचालय बांधकाम दीर्घकाळ वापरण्यास योग्य राहील अशी जागा निवडावी,

मैला गाळ व्यवस्थापनाच्या दृष्टीने खड्डयासाठीची जमीन विष्ठा/मल प्रक्रीया होण्यासाठी अनुकूल असावी आणि निवडलेली जागा खोलगट भागात नसावी, या तांत्रिक बाबी लक्षात घ्याव्यात.

२) सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी निवडलेली जागा पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून (नदी, विहिर, तळे, हातपंप इत्यादी) सुरक्षित अंतरावर असणे आवश्यक आहे.

३) सामुदायिक शौचालयाची जागा, वापर करणाऱ्या समूहासाठी सोयीची आणि सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी.

४) जागा निवडताना बांधावयाच्या प्रस्तावित शौचालयास पाणी, वीज अशा अनुषंगिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी अडचण येणार नाही याचीही काळजी घ्यावी.

५) गावात अनुसुचित जाती/जमाती, वा, आर्थिकदृष्टया वा स्थलांतरीत मजूर लोकसंख्या बऱ्याच प्रमाणात असल्यास अशा गावात जागा निवड करताना प्रामुख्याने अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती लोकसंख्या असलेल्या, आर्थिकदृष्टया दुर्बल लोक असणाऱ्या तसेच स्थलांतरीत मजूर लोकसंख्या असणाऱ्या वसाहतीजवळ व उपयोगाच्या ठरतील अशा जागांना सामुदायिक शौचालयांच्या बांधकामासाठी प्राथम्य देता येईल.

६) त्याशिवाय, गावातील जागेअभावी वैयक्तिक शौचालय नसलेल्या कुटुंबांची संख्या विचारात घेऊन व त्यांचे राहण्याचे ठिकाणा जवळ असतील, अशा जागांची सुध्दा सामुदायिक शौचालयांच्या बांधकामासाठी प्राथम्याने निवड करता येईल.

७) तसेच, ज्या ठिकाणी लोकांची नेहमी वर्दळ/गर्दी असते (उदा. बाजार), अशा जागांची सामुदायिक शौचालयांच्या बांधकामासाठी निवड करता येईल.

८) उपरोक्त बाबी लक्षात घेवून ग्रामसभेच्या परवानगीने ज्या प्रकारची निकड आहे, ती लक्षात घेवून सार्वजनिक शौचालयाकरीता जागा निश्चित करण्यात यावी.

**क) प्रस्तावाचे सादरीकरण आणि मान्यता प्रक्रिया:-** संबंधित ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे, गावासाठी सामुदायिक शौचालयाची मागणी करणारा आणि निधीसह इतर सर्व तरतुदी/अटी मान्य असल्याचा ग्रामपंचायतीचा ठराव,

गावातील जागे अभावी तसेच अन्य कारणामुळे वैयक्तिक शौचालय नसणाऱ्या कुटुंबांची संख्या, वृध्द, महिला आणि लहान मुलांसह तपशील आणि आठवडी बाजार, धार्मिक उपक्रम ई. नैमित्तिक कामासाठी येणाऱ्या, स्थलांतरित होवून आलेल्या बाहेरगावच्या लोकसंख्येचे प्रमाण, यासह विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच विवरणपत्र १ व २ नुसार माहिती प्रस्तावासोबत सादर करण्यात यावी.

सदर प्रस्तावाच्या आधारे उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, जिल्हा परिषद यांनी संकुलाच्या बांधकामात केंद्र शासनाच्या जून/जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन संकुल बांधकामासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे. (विवरणपत्र-३) संकुलाच्या जागेच्या भुस्तराचा व गावाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, जिल्ह्याच्या दरसूचीच्या आधारे सोबतच्या विवरणपत्र १ व २ नुसार माहितीसह सदर संकुलाचे अंदाजपत्रक तयार करावे. पुढे परिच्छेद ड मध्ये नमूद केल्यानुसार संकुलासाठी अनुज्ञेय केलेल्या आर्थिक तरतुदीपेक्षा जास्त रक्कमेची आवश्यकता असल्यास फरकाची रक्कम ग्रामपंचायतीने कृती संगमातून (Convergence) नियोजित करावी.

वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयानुसार तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्रदान करावी व सदर शासन निर्णयात नमूद कार्यपध्दती अनुसरावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावासाठी जिल्ह्याच्या एकत्रित निधी मागणीचा प्रस्ताव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूरकडे सादर करावा.

उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, जिल्हा परिषद यांनी उपरोक्त नमूद कार्यपध्दतीनुसार संकुल बांधकामासाठी यंत्रणा निश्चित करून, कामाची अंमलबजावणी विहित कालावधीत होईल याची दक्षता घ्यावी.

**ड) <u>सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम पद्धती:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामास रितसर परवानगी मिळाल्यावर ग्रामपंचायत तालुकास्तरीय तांत्रिक यंत्रणेच्या मदतीने सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचे बांधकाम करू शकेल. तथापि, शाश्वततेच्या पार्श्वभूमीवर तयार होणारे संकुल तांत्रिक दृष्ट्या सुयोग्य असावे, बांधकाम

आकर्षक व्हावे आणि जिल्ह्यातील सर्व संकुल एकाच पद्धतीची असावीत यासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करू शकेल. जिल्हास्तरावर याकामासाठी इच्छुक संस्था, बांधकाम व्यावसायिक यांना निमंत्रित करून, उपलब्ध पर्यायानुसार अपेक्षित बांधकामाचे दरपत्रक ठरवून, त्यांचे विहित शासकीय कार्यपद्धती अवलंबून पॅनल तयार करता येईल. पॅनलची यादी सर्व संबंधित ग्रामपंचायतींना पाठवून बांधकामासाठी हा पर्याय उपलब्ध करून देता येईल. या पद्धतीत बांधकाम दर्जा संबंधी सनियंत्रण करणे सुलभ होवू शकेल.

**इ) सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम तांत्रिक पर्याय:-** राज्यातील सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी ट्वीन लीच पिट (दोन शोषखड्ड्याचे शौचालय) हा तांत्रिक पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. हा पर्याय कमी खर्चाचा, वापरण्यास सोपा, कमी पाण्याची गरज असणारा, पर्यावरण अनुकुल आणि मैला गाळ व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत सोयीचा आहे. या तांत्रिक पर्यायासंबंधी संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांमधील परिशिष्ट १ भाग-२ मध्ये (मार्गदर्शक सूचनांमधील पृ. ७४) नमूद केलेले तांत्रिक पर्यायासंबंधी drawing/टाईप डिझाईन (विवरणपत्र ३) विचारात घेण्यात यावे. गावात तृतीय पंथ व्यक्तींकरीता शौचालय सुविधा आवश्यक असल्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि निधी उपलब्धता विचारात घेऊन, सार्वजनिक/सामुदायिक शौचालयाचे design घेण्यात यावे. दिव्यांग व्यक्तिंकरिता सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामाबाबत Handbook on accessible household sanitation for persons with Disabilities (PwDs), २०१५ तसेच, संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील परिशिष्ट १ भाग-२ येथे नमूद मार्गदर्शक सूचनांमधील पृ. ७४ येथे नमूद पुस्तिकांचा संदर्भ घेण्यात यावा. सार्वजनिक शौचालय बांधकामामध्ये Twin pit पद्धतीस प्राधान्य द्यावे. एक खड्डा शौचालय घेण्यात येवू नये. जमिनीच्या भूस्तरानूसार दोन खड्डे पध्दतीचे तंत्रज्ञान वापरणे शक्य नसल्यास अशा ठिकाणी सेप्टिक टॅंक पध्दतीच्या सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे.

सार्वजनिक शौचालय वापर करण्याऱ्या लोकसंख्येनुसार Twin pit/septic tank चे आकार design करण्यात यावे. Septic tank प्रकारचे सार्वजनिक शौचालय प्रस्तावित करतेवेळी निर्माण होणा-या मैला गाळ व्यवस्थापनाची तरतूद प्रस्तावामध्ये नमूद असावी. तसेच सेप्टिक टँकमधून overflow होणारे मैला मिश्रित पाणी उघडयावर जावू नये याकरीता सेप्टीक टँक असलेल्या सार्वजनिक शौचालयामध्ये सेप्टीक टँक मधून वाहणाऱ्या मैला मिश्रित पाण्याच्या निचऱ्याकरीता शोषखड्डा असणे अनिवार्य आहे. सार्वजनिक शौचालयास जलजीवन अभियानातून पाणी द्यावे. तसे न झाल्यास, पाणी पुरवठा करण्यासाठीच्या बाबींचे दर अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असावेत. त्याशिवाय शौचालयास विज पुरवठा अनिवार्य असून ईलेक्ट्रीक लाईट व्यवस्था करावी. महिलांच्या शौचालयामध्ये सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशिन/इन्सिनेटरची सुविधा असणे आवश्यक आहे. सार्वजनिक शौचालयापासून लाभ मिळणा-या नागरीकांनी बांधकाम करतेवेळी पर्यवेक्षण करावे. त्यांना पर्यावेक्षणास ग्रामपंचायतीने पाचारण करावे. अशी अट शौचालयाची प्रशासकीय मान्यता देतांना नमूद करण्यात यावी.

सार्वजनिक शौचालयाचे रेखांकन (Design) करताना, सार्वजनिक शौचालयामध्ये पुरेशा प्रमाणात सुर्यप्रकाश आणि हवा खेळती राहील अशी व्यवस्था असेल याबाबत दक्षता घ्यावी. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या कुटूंबांची नावे भिंतीवर पेंटींगव्दारे दर्शविली जाऊ शकतात.

उपरोक्तनुसार जिल्हा दर सूची प्रमाणे दर व बाबींचे वर्णन आवश्यकतेनुरूप बदलवून, जागेच्या उपलब्धतेनुसार, भौगोलिक स्थितीनुसार व संकुल बांधकामाच्या जागेच्या भूस्तरानुसार तांत्रिकदृष्टया सुरक्षित व योग्य पर्याय निवडून त्यानुसार संकुल बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करावे. ज्या ठिकाणी वरील प्रमाणे संकुल बांधकाम करणे भौगोलिक स्थितीमुळे शक्य नसेल अशा ठिकाणी अन्य प्रकारचे तांत्रिक दृष्ट्या योग्य व योग्यरीत्या मैला व्यवस्थापन होईल, याचा विचार करुन अशा पद्धतीच्या संकुलाचे बांधकाम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने प्रस्तावित करावे.

उपरोक्त नमूद प्रकारच्या शौचालयाच्या बांधकामाची किंमत काही जिल्ह्यांना जर अनुज्ञेय रू.३ लाखांपेक्षा जास्त जात असेल व त्यामुळे कामे घेता येत नसतील तर संबंधित अभियंत्याने आपल्या विभागातील कोणत्याही ३ व जवळच्या १ जिल्ह्यातील (इतर विभागातला सुध्दा चालेल) शौचालयाचे रेखांकन व अंदाजपत्रके घेवून त्यांचा तुलनात्मक अभ्यास करून किंमत वाढीकरीता कारणास्तव बाबी नमूद करून, तसेच प्रती बैठक (per seat) बाबनिहाय खर्च काढून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे मार्फत त्यांच्या अभिप्रायासह शासनास राज्य व पाणी व स्वच्छता समितीच्या माहितीने सादर करावे. शासन गरज पडल्यास काही विशिष्ट प्रकरणात २x२ ऐवजी २x१ वा त्यापेक्षा कमी शौचालय बैठक व्यवस्था व इतर सोई कमी असलेल्या शौचालयांच्या बांधकामाकरीता परवानगी देईल.

उपरोक्त फक्त शौचालया व्यतिरिक्त, शौचालयाबरोबरच ग्रामपंचायतीने स्नानगृह अथवा दुकान त्याच ईमारतीत काढले तर मात्र त्या जास्तीच्या बाबींकरीता स्वच्छ भारत अभियान (ग्रा) मधून निधी उपलब्ध होणार नाही. त्याकरीता ग्रामपंचायतीस विहीत निकष पाळून त्यांचा स्वनिधी अथवा अबंधित १५ वा वित्त आयोग अथवा ईतर निधी स्त्रोत वापरुन त्यांची कार्यप्रणाली व मंजूरी व्यवस्था वापरुन, मान्यता घेवून अशी अतिरीक्त बांधकामे सार्वजनिक शौचालयांसोबत करता येतील.

ई) <u>सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम निधी तरतूद:-</u> संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम करण्यासाठी एकूण रूपये ३,००,०००/- (रूपये तीन लक्ष ) इतकी निधी मर्यादा देण्यात आली आहे. या निधीपैकी ३०% म्हणजेच रु. ९०,०००/- (रुपये नव्वद हजार) पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीतून ग्रामपंचायतीने उपलब्ध करून द्यायचे आहेत. उर्वरित रुपये २,१०,०००/- ( रूपये दोन लक्ष दहा हजार) (७०%) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ च्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जातील. यामध्ये केंद्र हिस्सा ६०% व

राज्य हिस्सा ४०% असेल. सार्वजनिक/सामुदायिक शौचालयाची मागणी करण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीला पंधराव्या वित्त आयोगाच्या मिळणाऱ्या निधीतून स्वत:चा हिस्सा, अर्थात रुपये. ९०,०००/- (रुपये नव्वद हजार) ची तरतूद करून घ्यावी लागेल. विहित मर्यादेपेक्षा जास्त अंदाजपत्रक असल्यास तसेच स्थानिक ठिकाणी गरजेनुसार शौचालयाबरोबरच इतर स्वच्छता अनुषंगिक सार्वजनिक/ सामुदायिक सुविधा शौचालय संकुलात वाढविणे, संकुल इमारत व परीसराचे सुशोभीकरण ई. कामे करायची असल्यास त्यासाठीचा सर्व खर्च ग्रामपंचायतीला स्वत:कडील निधी/ लोकसहभाग/स्थानिक स्त्रोतांमधून करावा लागेल. निधी उपलब्धतेबाबत सविस्तर तपशिल प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे.

उ) <u>कार्यान्वीत यंत्रणा:-</u> ज्या ग्रामपंचायतीत सदर सार्वजनिक/सामाजिक शौचालयाचे बांधकाम घेण्याचे प्रस्तावीत आहे, ती ग्रामपंचायत सदर कामाकरिता कार्यालयिन यंत्रणा राहील.

ऊ) **<u>अनुषंगिक सुविधांची उपलब्धता:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या परिसरात वापरकर्त्यांची सोय आणि सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा शाश्वत वापर होण्यासाठी अनुषंगिक व्यवस्था उपलब्ध असणे अत्यंत महत्वाचे आहे. या अनुषंगिक व्यवस्थांचा आराखड्यात समावेश असल्याची खात्री संबंधित ग्रामपंचायतीने करून घ्यायची आहे. अनिवार्य व ऐच्छिक सुविधा खालीलप्रमाणे आहेत. त्या व्यतिरिक्त काही सुविधा आवश्यक वाटल्यास, ग्रामपंचायतीने स्वत:कडील निधीसह इतर संसाधनांचा अंदाज घेवून, या सुविधा उपलब्ध करून घेण्यासंबंधी निर्णय घेण्यात यावा.

<u>अनिवार्य सुविधा</u> :-

- स्वच्छतेसाठी नियमित पाणी पुरवठा आणि पाणी साठवण व्यवस्था.
- हात धुण्याची सुविधा (वॉश बेसिन).
- दिव्यांग व्यक्तींना/लहान मुलांना/वृध्द व्यक्तींना शौचालये वापरता यावी या करीता आवश्यक सुविधा.

- सार्वजनिक शौचालय संकूलात महिलांसाठी शौचालयाची स्वतंत्र सुविधा.
- वीज जोडणी.
- मैलागाळ व्यवस्थापनसंबधी सुविधा.(भरलेला शौचालय खड्डा रिकामा करण्याची वा सेप्टीक टँक मधील मैला गाळ व्यवस्थापनाची सुविधा)
- शौचालय आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी साफसफाईची साधने, जंतुनाशके व नियमित व्यवस्था.
- संकुलातील घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा.
- संकुल बांधकाम तपशील आणि संकुलातील सुविधांची माहिती देणारा सविस्तर फलक.
- शौचालयाच्या दारांना कडी कोंडे
- आयईसी पोस्टर्स. (हात धुण्याची पद्धत, शौचालय वापरण्याची पद्धत, स्वच्छतेसाठी लागणारे सामान, त्याच्या वापराची पद्धती इत्यादी.)

<u>ऐच्छिक सुविधा</u> :-

- स्नानघर.
- शौचालय आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी लागणारे साहित्य आणि उपकरणे.
- पायवाट, सौंदर्यीकरण.

ए) <u>देखभाल व दुरुस्ती धोरण:-</u> स्वच्छतागृहे पाणी व वीजेसहीत स्वच्छ व वापरण्यायोग्य ठेवण्याच्या दृष्टीने त्यांची देखभाल उत्तमरित्या होणे अपेक्षित आहे. त्याकरिता ग्रामपंचायतींनी गावातील महिला बचत गट अथवा <u>स्वंयसहाय्यता गटांना (Community based Organisation or SHGS)</u> अथवा संस्थेस साफसफाई ठेवून शौचालय सुविधा नागरीकांना पुरविण्याकरिता चालवण्यास देता येतील सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या प्रस्तावात संबंधित ग्रामपंचायतीला प्रस्तावित सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या दोन वर्षापर्यंतच्या देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध असल्याची हमी द्यावी लागेल.

निधी उपलब्धतेसाठी आवश्यकतेनुसार “पे ॲण्ड युज (वापरशुल्क देऊन वापरा) सारख्या पद्धत अनुसरता येईल अशा वेळेस पुढील प्रमाणे कार्यवाही करता येईल:-

- i) करार करणे: ग्रामपंचायत संपूर्ण देखभाल व दुरूस्ती किंवा विशिष्ट देखभाल व दुरूस्ती कामांकरिता स्वयंसाहाय्यता गट (SHG) /एजन्सी सोबत करार करु शकते, (वीज आणि पाणी शुल्क वगळता), स्वच्छता सामग्रीची तरतूद आणि एकवेळ,देखभाल/दुरूस्तीची कामे,ग्रामपंचायतकडून करण्यात येईल.
- ii) भाडेपट्ट्याने देणे: ग्रामपंचायती द्वारे संपूर्ण सुविधा खाजगी संस्था/स्वयंसहाय्यता गट/एजन्सीला भाड्याने दिली जाऊ शकते. खाजगी संस्थाच्या सर्व बाबींची काळजी घेऊ शकते आणि त्याच्या परिचालन खर्चाची पूर्तता करण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारू शकते. तथापि, ग्रामीण समुदायाच्या स्वच्छतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरकर्ता शुल्क माफक प्रमाणात/कमी असावे आणि संबंधित वापरकर्ता समुदायासोबत सल्लामसलत करून निश्चित केले जावे. सदर बाबतीतील कराराच्या अटी करारात कटाक्षाने नमूद कराव्यात.
- iii) सामुदायिक व्यवस्थापन: वीज आणि पाणी शुल्क, स्वच्छता सामग्रीची तरतूद आणि एकवेळ देखभाल/दुरुस्तीची कामे यासाठी ग्रामपंचायतीच्या सहाय्याने चक्राकार आधारावर वापरकर्ता कुटुंबांद्वारे दैनंदिन देखभाल व स्वच्छता करण्यात यावी. एकतर प्रत्येक कुटुंब मासिक/साप्ताहिक आधारावर देखभाल व स्वच्छतेसाठी जबाबदारी घेऊ शकते किंवा या सुविधेचा वांपर करून त्याचा खर्च वापरकर्त्या समुदाय सदस्यांमध्ये विभागला जाऊ शकतो.
- iv) सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP): नियमित देखभाल व दुरुस्तीकरिता CLF (समुदाय स्तरावरील फेडरेशन) स्थानिक उद्योग/व्यावसायिक संस्था/बाह्य एजन्सी यांचे सोबत भागिदारी केली जाऊ शकते. अशा भागीदाराची उभारणी पंचायत समिती/जिल्हा स्तरावर केली जाऊ शकते, जेणेकरून महसूल निर्मिती आणि योग्य प्रमाणात आर्थिक लाभ होईल.

ऐ) सार्वजनिक शौचालयाच्या देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायती खालीलप्रमाणे महसूल (उत्पन्न) निर्माण केला जाऊ शकतो) :-

- ग्रामपंचायत सार्वजनिक शौचालयावरील पाण्याची टाकी, शौचालयाच्या बाहेरील भिंतींचा वापर जाहिराती किंवा wall painting करिता करु शकते. त्यातून मिळणारे उत्पन्न हे ग्रामपंचायतीसाठी चांगले साधन ठरु शकते. त्याशिवाय नियमानुसार अनुज्ञेय असल्यास शौचालयाच्या छतावर जाहीरात फलक लावून सुध्दा उत्पन्न मिळू शकेल. दैनंदिन घरगुती वस्तू विक्री करणारे छोटे दुकान स्थानिक परिस्थितीनुसार सार्वजनिक शौचालयाला जोडले जाऊ शकते. दुकानाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी दुकानदारावर राहील आणि ग्रामपंचायत मासिक भाडे दुकानराराकडून घेऊ शकते. या शिवाय शौचालयाच्या वापरासाठी काही ठराविक वापर शुल्क वसूल करता येईल. तसेच, सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या कुंटुंबाना सुध्दा शौचालय साफ, स्वच्छ व वापरायोग्य ठेवण्याची जबाबदारी देता येईल.

ओ) <u>**सुशोभीकरण आणि सुरक्षा:-**</u> सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा शाश्वत वापर होण्यासाठी शौचालय परिसर सुशोभित असणे आणि वापरकर्त्यांच्या दृष्टीने सुरक्षित असणे गरजेचे आहे. शौचालय परिसरात शोभेची झाडे, सावली देणारी झाडे लावून, भिंतींवर स्वच्छतेसंबंधी चित्र आणि संदेश रेखाटून परिसर सुशोभित करता येईल. वृक्षारोपणाचा खर्च स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ मधून अनुज्ञेय नसून, मनरेगामधून करण्यात यावा.

औ) <u>**दस्ताऐवजीकरण:-**</u> सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासंदर्भात ग्रामपंचायत आणि प्रत्यक्ष संकुलाच्या ठिकाणी पुढीलप्रमाणे दस्ताऐवजीकरण करणे गरजेचे आहे:-

| दस्ताऐवजीकरण स्तर | दस्ताऐवजीकरण तपशील |
|---|---|
| ग्रामपंचायत स्तर | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल प्रस्ताव, मंजुरी पत्र, |

| | |
|---|---|
| | आराखडा, वापरकर्त्या समूहाचा तपशील, संचालन आणि देखभाल दुरुस्ती संबंधी वार्षिक करार, देखभाल दुरुस्ती आणि उपकरणासंबंधी केलेला खर्च आणि लोकसहभाग संबंधीची माहिती इत्यादी संबंधी तपशील गरजेनुसार संचिका किंवा नोंदवहीत अद्ययावत ठेवणे. |
| संकुल स्तर | शौचालय सुविधेच्या केलेल्या वापराचा व शुल्क आकारले जात असल्यास त्यासंबंधी दैनंदिन नोंदी अभिप्राय पुस्तिका इत्यादी. |

तसेच, शौचालयाची माहीती केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळावरील MIS मध्ये शौचालयाची माहीती, खर्च व geotapping करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०४१२१५११५५४३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, pseudonym=268C7E15F99BF8B492638E14751A661EBCF0233F, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2022.04.12 15:19:40 +05'30'

**(चं.कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

५. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.

७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.

९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी

१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११.सहसचिव (स्वभामि) तथा अभियान संचालक (स्वच्छ भारत अभियान),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१२.प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१४.उपायुक्त (विकास), सर्व.

१५. संचालक,मीत्रा नाशिक/ संचालक, नीरी नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय.

१६.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७. उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग सर्व.

१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१९. कक्ष अधिकारी संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचे शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

निवडनस्ती,पापु-१६.

## विवरणपत्र १

## सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासाठी ग्रामपंचायत स्तर सांख्यिकीय माहिती

| क्र. | माहितीचा तपशील | संख्या |
|---|---|---|
| ०१ | ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण गावे | |
| ०२ | एकूण कुटुंब संख्या | |
| ०३ | वैयक्तिक शौचालय असलेले कुटुंब | |
| ०४ | वैयक्तिक शौचालय नसलेले कुटुंब | |
| ०५ | इतर ठिकाणाहून दररोज नियमितपणे येणाऱ्या व्यक्तींची अंदाजे संख्या | |
| ०६ | बाहेर गावाहून येणाऱ्या लोकांसाठी भेट देण्याची ठिकाणे संख्या ( मंदिर, बाजार, कार्यालये इत्यादी.) | |
| ०७ | धार्मिक/सामाजिक कारणांसाठी बाहेरुन गावात येणाऱ्या लोकांची वार्षिक अंदाजे संख्या | |

## विवरणपत्र २

## सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासाठी पडताळणी सूची

| क्र. | पडताळा घटक | पर्याय | सध्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | हागणदारीमुक्त दर्जा . | आहे/नाही | | |
| ०२ | वैयक्तिक शौचालय नसलेले कुटुंब. | संख्या | | |
| ०३ | यापूर्वी बांधलेले सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल. | संख्या | | |
| ०४ | यापूर्वी बांधलेले सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा वापर. | आहे/नाही | | |
| ०५ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामसभेचा ठराव | आहे/नाही | | |
| ०६ | १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायत हिस्सा देण्याचा ठराव. | आहे/नाही | | |
| ०७ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल देखभाल दुरस्ती ग्रामपंचायत स्वनिधीतून करेल, याबाबतचा ठराव. | आहे/नाही | | |
| ०८ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी पुरेसे पाणी उपलब्धतेचा ठराव. | हो/नाही | | |
| ०९ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामपंचायत कडून वीज जोडणी देणेबाबतचा ठराव. | हो/नाही | | |
| १० | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल शाश्वत स्वरुपात उपलब्ध राहील ग्रामपंचायत हमीपत्र. | आहे/नाही | | |
| ११ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल चालवायला घेणाऱ्या गटाचे/संस्थेचे पत्र. | आहे/नाही | | |
| १२ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामपंचायतीकडे स्वत:ची जागा. | आहे/नाही | | |
| १३ | संकुलांसाठी ग्रामपंचायतीकडे स्वत:ची जागा नसल्यास पर्याय. | आहे/नाही | | |
| १४ | पर्यायी जागेचे दानपत्र/ बक्षिसपत्र. | आहे/नाही | | |
| १५ | उपलब्ध आणि निर्धारित जागा रिकामी असल्याचे छायाचित्र. | आहे/नाही | | |
| १६ | शौचालय संकुलाची मागणी करणाऱ्या कुटुंबांचे नियमित वापरासंबंधी हमीपत्र. | आहे/नाही | | |
| १७ | सार्वजनिक/सामुदायिक संकुल धार्मिक/सामाजिक संस्था परिसरात प्रस्तावित असल्यास संकुलाचे शाश्वत संचालन व त्याचे दायित्व याबाबत संबंधीत संस्थेचे हमीपत्र. | आहे/नाही | | |


**सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाची मागणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील प्रस्ताव आणि पडताळणी सूचित दर्शविल्याप्रमाणे सर्व ग्रामपंचायत ठराव, पत्र, छायाचित्रे सोबत जोडावीत.**

परिशिष्ट - 3


## > Community Sanitary Complexes (CSCs) in all villages

*(Habitations with predominant landless, migrant, SC/ST population may be prioritized)*


***Schematic of a 2x2 community toilet***




FRONT ELEVATION




SECTION OF WALL FOOTING




| DETAILES OF OPENING: - |
|---|
| D3- 0.80 X 2.00 M PVC FLUSH DOOR D4- 0.80 X 2.00 M IRON GRILL DOOR V- 0.60 X 0.30 M IRON VENTILATOR |
| PLINTH AREA:- 19.25 SQM |
| SLAB AREA:- 10.85 SQM |

» **For more details:** Handbook on Accessible Household Sanitation for Persons with Disabilities (PwDs), 2015, Swachh Bharat Mission, Grameen , Ministry of Drinking Water and Sanitation, Government of India, New Delhi

» ' T ' for Toilet - A Technical Guidebook for Household Toilets for Different Conditions in Rural Maharashtra, 2014, Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra.

» Toilet Technology Options for Swachh Haryana, 2016, Development and Panchayat Department, Government of Haryana.